गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्हात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २६६ वा | शुक्रवार १६ फेब्रुवारी २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 266 | Date : 16/02/2024 blow :Frisday Page 4 Price 4

## अजित पवार गट हा मूळ राष्ट्रवादी पक्ष, विधानसभा अध्यक्षांचा निकाल

मुंबई : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आमदार अपात्र प्रकरणी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज पाच याचिकांवर निर्णय दिला. रद पवार गटाकडून तीन तर अजित पवार गटाकडून दोन याचिका सादर करण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांवरून पक्षाची राज्यघटना, पक्षाचं नेतृत्व आणि पक्षाचा विधिमंडळ गट यावरून यासंदर्भातला निर्णय घेतला गेला असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष कुणाचा हे ठरवताना विधिमंडळ बहुमताचा विचार करावा लागेल. अजित पवार गटाकडे ५३ पैकी ४१ आमदार आहेत. या बहुमताला शरद पवार गटाने आव्हान दिलेले नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा अजित पवार यांचाच आहे. त्यामुळे अजित पवार गटाला विधिमंडळ पक्षाचा पाठिंबा आहे. नेतृत्व संरचना किंवा पक्ष संघटनेवरून कोणता गट पक्ष आहे हे निश्र्चित होत नाही. त्यामुळे विधिमंडळ पक्षाच्या संख्याबळानुसार अजित पवार गट खरा राष्ट्रवादी पक्ष असल्याच्या निष्कर्षावर मी आलो असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात



कोणतीही फूट पडलेली नाही. तर दोन गट तयार झाले आहेत. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी पक्षाध्यक्षपदावर दावा केला आहे. तसेच पक्षाध्यक्षपदी आता जे आहेत, त्यांची निवड योग्य प्रक्रियेनुसार झाली नसल्याचाही दावा दोन्ही गटाकडून करण्यात आला आहे. ३० जून २०२३ रोजी अजित पवारांना पक्षाच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. शरद पवार गटाने या प्रक्रियेला विरोध केला. त्यातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात फूट पडल्याचे ३० जून रोजीच स्पष्ट झाले. अजित पवारांची निवडणूक पक्षघटनेच्या विरोधी आहे असा दावा शरद पवार गटाने केला आहे. पक्षाचा अध्यक्ष कोण आहे? हे मी ठरवू शकत नाही, अशी माहिती राहुल नार्वेकर यांनी दिली.

शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी घेताना विधानसभा अध्यक्षांना १५ फेब्रुवारीपर्यंत आमदार अपात्रतेप्रकरणी निकाल देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ३१ ऑक्टोबरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ जानेवारीपर्यंत निकाल देण्याचे आदेश होते. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकरांच्या वकिलांच्या विनंतीनुसार १५ दिवसांची मुदतवाढ दिली होती.

## उद्धव ठाकरेंनी आमची मनं दुखावली, आता त्यांच्यासोबत कधीच युती नाही

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

मुंबई : उद्धव ठाकरे यांनी आता सोबत येण्याची दारं बंद केली आहेत, आमची मन दुखावली आहेत. ज्या प्रकारे पंतप्रधान मोदींवर बोलतात, खालच्या पातळीवर बोलतात. मनं दुखावली आहेत. जिथे मन दुखावतात तिथे युती होणे शक्य नाही. पॉलिटिकली डीफरन्स असतील तर युती होऊ शकते पण येथे पण आमची दुखावली आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासोबत कोणत्या स्थितीमध्ये युती होणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते लोकमतच्या एका कार्यक्रमात बोलत होते.

मतदाराला काही किंमत आहे की नाही? आपल्याकडे अनेक नेते येत आहेत, असा प्रश्र्न यावेळी त्यांना विचारण्यात आला. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, याचं श्रेय नरेंद्र मोदी यांच्या कामांना द्यावं आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वाला द्यावं. हीच स्थिती राहुल गांधी, शरद पवार यांची आहे. उद्धव ठाकरे हे तर आतां सगळीकडे जातंय आणि आमच्या नावाने शिमगा करताय. आगे आगे देखो होता है क्या... बरेच चांगला लोक आहेत जे इच्छुक आहेत आमच्यासोबत यायला... वेवलेन्थ जुळली तर त्यांना सोबत घेऊ, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. जर लोक




आमच्या सोबत जय श्री रामचा नारा देत असेल तर आम्ही का सोबत घेऊ नये, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

या प्रश्र्नाचं उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, मी सरळ साधा माणूस आहे.चमत्कार होतात पण ते ठरवून माझ्याकडून होत नाहीत. माझा अजेंडा हा विकासाचा आहे, आता पॉलिटिक्स १० टक्के कराव लागतात, नाहीतर लोकशाहीमध्ये आपण टिकणार नाही. काही नेते कोकणात मराठवाड्यात फिरताय आता मागील अनेक वर्षांची भाषणं ऐका. त्यात एकदा तरी विकासाबद्दल बोलले आहेत का? ते तपासा. माझं फक्त पद बदल आहे, मिशन एकाच आहे विकासाचं, आमचं आणि एकनाथ शिंदे यांचं अंडरस्टँडिंग खूप चांगलं आहे. त्यामुळे हवं तसा घडतंय. महाराष्ट्राचा पुढचा मुख्यमंत्री हा महायुतीचाचं असेल. संख्याबळावर तो निर्णय होणार नाही.संख्यबळतर आमचंच जास्त असणार. पण निर्णय हे आमचे वरिष्ठ नेते घेतील, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज ठाकरे मनसेसोबत येतील की नाही हे तुम्हला लवकरच कळेल, आमचे ते चांगले मित्र आहेत. ते आमच्यावर टीकासुद्धा करतात पण ते सोबत येतील का? हे लवकरच कळेल. उद्धव ठाकरे । पान २ वर

## मध्य रेल्वे सोलापूर विभागात १५ किलोमीटर सुरक्षा कुंपण



सोलापूर/प्रतिनिधी : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात रेल्वे अपघात आणि इतर जीवित हानी रोखण्यासासाठी संवेदनशील ठिकाणी सुरक्षा कुंपणाचे काम हाती घेण्यात आले आहे. दौंड ते वाडी दरम्यान रेल्वेमार्गावर अतिसंवेदनशील आणि संवेदनशील ठिकाणे निश्र्चित करून तेथे सुमारे १५ किलोमीटर अंतराचे सुरक्षा कुंपण उभारण्यात आले आहे. याच रेल्वेमार्गावर अक्कलकोट भागातील अतिसंवेदनशील असणाऱ्या बोरोटी ते दुधनी दरम्यान सर्वात लांब २.४ किलोमीटर इतके तारेचे कुंपण उभारण्यात आले आहे. संवेदनशील असणाऱ्या बाळे-सोलापूर आणि बोरीवेल-मलठण अशा दोन ठिकाणी ४०० मीटर इतक्या सुरक्षा कुंपणाचे काम पूर्ण झाले आहे. या संरक्षक कुंपणामुळे रेल्वे गाड्यांचा वेग हा प्रतितास १३० किलोमीटरपर्यंत वाढू शकणार आहे. यातून सुरक्षिततताही जपण्यास मदत होणार आहे. मागील वर्षभरात सोलापूर विभागातील रेल्वेमार्गावर सुमारे शंभरपेक्षा जास्त जनावरे रेल्वेगाड्यांखाली चिरडली गेली होती. त्याचा विचार करता स्थानिक शेतकरी आणि गोपालकांनी आपली जनावरे रेल्वेरूळाजवळ आणू नयेत. अन्यथा रेल्वे सुरक्षा बलाकडून संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशारा रेल्वे प्रशासनाने दिला आहे.

## राज्यसभेसाठी महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांचे अर्ज दाखल

मुंबई : राज्यसभेच्या उमेदवारीसाठी महायुतीचे पाच आणि कॉंग्रेसचा एक अशा एकूण सहा उमेदवारांनी गुरुवारी अर्ज दाखल केले आहेत. कॉंग्रेसला 'जय महाराष्ट्र' करत नुकतेच भाजपमध्ये दाखल झालेले अशोक चव्हाण यांनी राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. चव्हाण यांच्यासोबत भाजपच्या मेधा कुलकर्णी आणि अजित गोपछडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल यांनी तर शिवसेना शिंदे गटाकडून मिलिंद देवरा यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. कॉंग्रेसकडून चंद्रकांत हंडोरे यांनी अर्ज दाखल केला आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज भाजपच्या तीन राज्यसभा उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यासाठी विधिमंडळात दाखल झाले होते. महायुतीतील सर्व उमेदवारांनी आज राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. देवरा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांसमोर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. मुंबई, महाराष्ट्र आणि भारत यांची प्रामाणिकपणे सेवा करण्याची संधी दिली.

राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून पटेल यांनी आज राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं की, मी आज राज्यसभेसाठी अर्ज भरला आहे. मी या आधी देखील राज्यसभेवर होतो. हा अर्ज मी का भरलेला आहे, हे येणारा काळ स्पष्ट करेल. रिक्त झालेली जागाही आमच्याकडेच राहणार आहे, असेही पटेल म्हणाले. कॉंग्रेसकडून । पान २ वर

## मराठवाड्याला पाणी देणाऱ्या कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाला वेग

मुंबई : कोल्हापूर-सांगली जिल्ह्यातील पूर व्यवस्थापन करतानाच दुष्काळग्रस्त मराठवाड्याला पाणी देणाऱ्या कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाला चालना मिळणार आहे. प्रकल्पासाठी जागतिक बँक अर्थसहाय्य करणार असून याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत आढावा घेतला.



बैठकीस खासदार संजयकाका पाटील, मुख्य सचिव नितीन करीर, मित्राचे सीईओ प्रवीण परदेशी, जागतिक बँकेचे प्रतिनिधी, नाबार्ड अधिकारी तसेच विविध विभागांचे सचिव, अधिकारी उपस्थित होते. जागतिक बँकेच्या मदतीने हा प्रकल्प राबविण्यात येणार असून यात जोखीम गृहित धरुन जलव्यवस्थापन, पूर व्यवस्थापन, संस्थात्मक क्षमता निर्माण आदी बाबी अंतर्भूत आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे मराठवाड्याचा मोठा फायदा होणार असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । पान २ वर

## जिल्ह्यात विभागीय चाचा नेहरु बाल महोत्सवाचा शुभारंभ

सोलापूर/प्रतिनिधी: अनाथ, निराधार, उन्मार्गी व इतर मुलांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या एकामेकांविषयी बंधुभाव सांघिक भावना निर्माण होण्यासाठी चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. बालकांचा आनंद व्दिगुणित करण्याकरिता आणि सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे महिला व बालविकास विभागाचे उपायुक्त संजय माने यांनी सांगितले.विभागीय उपायुक्त महिला व बालकल्याण विभाग पुणे व जिल्हा महिला बालकल्याण विकास अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहालय बालगृह, कारंबा ता.उत्तर सोलापूर येथे तीन दिवसीय विभागीय चाचा नेहरु बाल महोत्सव २०२३-२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन महिला व बालविकास विभागाचे उपायुक्त श्री. माने यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी श्री रमेश काटकर जि.महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर , बाल विकास प्रकल्प अधिकारी खोमणे विजय, किरण जाधव ,अमृत सरडे, स्नेहालय बालगृहच्या आधारस्तंभ चंदा बेन शिंगवी, वैशाली भोसले जिल्हा परिविक्षा अधिकारी सोलापूर शासकीय मुलींचे बालगृह अधिक्षक अमर भोसले, वैद्यकीय अधिकारी डॉ एस.व्ही कांबळे. वर्षा पाटील तसेच विद्यार्थी, महिला व विकास विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महिला व बालविकास विभागाचे उपायुक्त श्री. संजय माने म्हणाले, मुलांना अभ्यासासोबतच कला, क्रिडा अशा विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविता यावे तसेच बालकांचा शारीरिक विकास व्हावा या दृष्टीने कबड्डी, धावणे, गोळा फेक आदीसह विविध स्पर्धा घेण्यात येतआहेत. तीन दिवशीय बाल महोत्सवात विद्यार्थ्यांनी खेळात तसेच मनोरंजन कार्यक्रमात आपले कला गुण दाखवावेत तसेच कुठल्याही प्रकारची इजा न होता हा महोत्सव पार पाडावा तसेच भविष्यात अनाथ मुले ही विविध क्षेत्रात नावारूपाला यावेत अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली आणि मैदानाचे पुजन करून स्पर्धांचे उदघाटन केले.

पुणे विभागातून आलेल्या पाच जिल्ह्यातील खेळाडूंचे आणि मान्यवरांचे महिला व बाल विकास अधिकारी रमेश काटकर यांनी स्वागत करून आभार मानले , कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाची रूपरेषा सांगून या कार्यक्रमात खेळाऐवजी । पान २ वर

## माघ यात्रा २०२४ साठी आलेल्या वारकरी भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समिती सुसज्ज

### मंदिर समिती सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य देणार; दर्शन रांगेत कार्तिकी यात्रेप्रमाणेच पत्रा शेडमध्ये अन्यछत्र सोयी सुविधा : गहिनीनाथ महाराज औसेकर

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील : पंढरपूर दि २० माळी यात्रा ही माग महिन्यातील शुद्ध एकादशी पंढरपुरात साजरी केली जाते सन २०२४ यावर्षी माग एकादशी मंगळवार दि २०/०२/२०२४ रोजी आहे त्याचा कालावधी दि १४ते२६/०२/२०२४ आहे या यात्रेला अंदाजे चार ते पाच लाख लोक भावी पंढरपूर शहरात असतात या भाविकांना पुरेसा सोयी सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत यामध्ये दर्शन रंगीत बॅरिकेटरिंग करून त्यावर ताडपत्री शेड ज्यादा पत्रा शेडची निर्मिती आपत्कालीन गेट विश्रांती कक्ष बसण्याची सुविधा लाईव्ह दर्शन कूलर फॅन मिनरल वॉटर चहा खिचडी वाटप करण्यात येणार असल्याची माहिती सहअध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. दर्शन रांगेतील भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात येणार असून त्यासाठी पूजन ची संख्या कमी करून स.६.००तेस.१२.०० पर्यंत दर्शन उपलब्ध राहणार आहे दर्शन रांग जलद व द्रित गतीने चालवण्यासाठी दर पन्नास मीटर व अंतरावर पर्वेक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे

तसेच यात्रे कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराची संबंधित असलेल्या परंपरेचे कटाक्षाने पालन करण्यात येणार असून त्याबाबतचे आवशयक नियोजन करण्यात आले आहे त्यामध्ये श्री ह भ प वासकर महाराज यांच्या दिंडीची नव मिला श्री विठ्ठल सभा मंडप इथे आरती व अभंग व श्री ह भ प आजरेकर महाराज पंढरपूर यांच्या अद्वादशींना नैवेद्य व त्रियोदशीला श्री ह भ प औसेकर महाराज यांच्या चक्री भजनाचे परंपरा असून एकादशीला पहाटेची नित्य महापूजा मंदिर समितीचे सदस्य महोदय यांच्या शुभहस्ते सह पत्नी संपन्न होत आहे

याशिवाय सोलापूर महानगरपालिका यांच्याकडील रेस्क्यू व्हॅन व प्रशिक्षित कर्मचाऱ्यासह सिद्ध फायर यंत्रणा अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम वायरलेस यंत्र जनरेटर मेटल डिटेक्टर मोबाईल लॉकर स्वरानिक प्रसारण सूचना प्रणाली चौकशी कक्षा मशीन अपघात विमा पॉलिसी इत्यादी व्यवस्था करण्यात आली आहे




**आरोग्य सेवा** पत्रासिटी तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष उपजिल्हा रुग्णालयाच्या मार्फत दर्शन मंडप येते आय सी यु तसेच माळवादावर वैष्णवी चारिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रुग्णवाहिका ठेवण्यात येणार आहेत

**स्वच्छता व्यवस्था** मंदिर व दर्शन मंडप तुकाराम मोहन येथील स्वच्छता मंदिर कर्मचाऱ्यामार्फत व नगर प्रदक्षिणा त दर्शन रांग मंदिर प्रदक्षिणा इत्यादी ठिकाणची स्वच्छता करण्यात । पान २ वर

## संपादकीय

### पक्षाला धोका..

अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणाऱ्या ठरावावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांची अक्षरश: धुलाई केली. लोकसभेच्या निवडणुका जेमतेम दोन-अडीच महिन्यांवर अपेक्षित आहेत. अशा वेळी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर संसदेत झालेल्या चर्चेत विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांनी राजकीय भाषणे केली आणि मोदी सरकारवर टीका करण्यातच धन्यता मानली. आपल्या पक्षाच्या व आपल्या सरकारच्या कोणी वाट्याला गेल्यावर मोदी काय शांतपणे ऐकून घेतील असा कोणी समज करून घेत असेल, तर ते मूर्खांच्या नंदनवनात वावरतात असेच म्हणावे लागेल. मोदींनी आपल्या भाषणात 'अबकी बार ४०० पार'चा दावा केला. संसदेत तसा दावा करण्याची हिंमत दाखवली. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे ३७० आणि एनडीएचे मिळून ४०० पेक्षा अधिक खासदार निवडून येतील अशी फोडही करून सांगितली. स्वत: पंतप्रधानांनीच संसदेत असा दावा केल्याने काँग्रेस व डाव्या पक्षांचे पित्त खवळले. त्यांच्या पायाखालची वाळूच घसरली. येणाऱ्या निवडणुकीनंतर आपण कुठे असणार, आपले व आपल्या पक्षाचे काय होणार या चिंतेने काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांना ग्रासले आहे. काँग्रेसचे नेते मोदी सरकारच्या विरोधात जो दिल्लीत थयथयाट करीत आहेत तसाच हल्ला-गुल्ला ठाकरे गटाने राज्यात केला. मोदी सरकारला शत्रू मानणाऱ्या विरोधी पक्षाने चर्चेत नुसता हल्लाबोल चालवला होता. मोदींचे भाषण शंभर मिनिटांचे होते. त्यात त्यांनी सर्वाधिक टार्गेट काँग्रेसला केले. काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २००४ ते २०१४ या दहा वर्षांत काय केले व भाजपप्रणीत एनडीए सरकारने गेल्या दशकात काय केले, असा तुलनात्मक आलेखच त्यांनी मांडला. भ्रष्टाचार, रोजगार, महिला, शेतकरी, महागाई, पर्यटन अशा विविध मुद्द्यांवर आपल्या सरकारने कशी वेगवान प्रगती केली हे त्यांनी अभिमानाने सांगितले. काँग्रेस पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी दिली नाही, नव्या पिढीकडे सूत्रे सोपवली नाहीत, तेच चेहरे व नेतृत्व करणारी तीच घराणेशाही यात पक्षाचे अतोनात नुकसान झाले. तरी काँग्रेस काही बोध घेत नाही, ही वस्तुस्थिती आहे. स्वत: मल्लिकार्जुन खर्गे यांना राज्यसभेत का जावे लागले, गुलाम नबी आजाद यांना काँग्रेस पक्ष सोडण्याची का पाळी आली, हे प्रश्न पंतप्रधानांनीच काँग्रेसला विचारले आहेत. आपण सत्तेवरच आहोत, आपण म्हणजे सरकार आहोत, अशा मानसिकतेत काँग्रेस आजही वावरत आहे, हाच पक्षाला मोठा धोका आहे.

पान १ वरुन

### उद्धव ठाकरेंनी आमची मनं..

यांनी आता सोबत येण्याची दार बंद केली आहेत, आमची मनं दुखावली आहेत. ज्या प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदींवर बोलतात, खालच्या पातळीवर बोलतात. त्यामुळे मनं दुखावली आहेत. जिथे मनं दुखावतात तिथे युती होणे शक्य नाही. पॉलिटिकली डीफरन्स असतील तर युती होऊ शकते पण येथे पण आमची मनं दुखावली आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

शरद पवार यांच्यासोबत चर्चा होऊनच बैठक होऊनचं त्यावेळी अजित पवार आणि मी तयारी करून शपथ घेतली, आणि ऐनवेळी शरद पवार मागे गेले. शरद पवार यांनी विश्वासघात केला. पण अजित पवार यांना हे पटलं नव्हतं. शरद पवार यांना विश्वासात घेऊनच निर्णय झाला होता.मला अनेक लोकांना एक्सपोज करायचा नाहीये.यावर २-४ वर्षांत पुस्तक लिहिलं मग स्पष्ट होईल.आतले घटनाक्रम सांगेल. अजित पवार यांना तोंडघाशी पाडण्याचा काम त्यावेळी या सगळ्यांनी केलं होतं, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उद्धव ठाकरे यांच्यासोबतचे आमदार आमच्यासोबत त्यावेळीच यायला तयार होते, ते मला स्वत: बोलायचे. उद्धव ठाकरे यांनी जे जे काही केलं, जी वागणूक नेत्यांना दिली त्यामुळे ते लोक आमच्यासोबत शिवसेना आमदार आले. आम्हाला काही करावं लागलं नाही. जसा शिवसेनेत झालं तसं अजित पवार आणि त्यांच्या आमदारांचा सफोकेशन त्यांच्या पक्षात होतं. पक्षात अजित पवार यांना नंबर २ वरच राहावं लागलं असतं, कधीच शरद पवार यांनी त्यांना नेतृत्व दिलं नसतं. उमेदवार आता निवडणुकीत इकडे तिकडे जाऊ शकतो. पण सगळे उमेदवार त्या त्या त्यांच्या पक्षावर त्यांच्या चिन्हवर निवडणूक लढावतील, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

सध्या मराठा आंदोलन सुरु आहे, त्याला काउंटर ओबीसी आंदोलन सुरु आहे. याला पॉलिटिकल अँगलने मी पाहत नाही. प्रत्येकला जातीतून पाहायचं आहे, हे महाराष्ट्र साठी दुर्दैवी आहे. आम्ही आंदोलनाला सकारात्मक पाहत आहोत. आम्ही मराठा समजला आरक्षण देणार आहोत, ओबीसी आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही. आरक्षण देणं हे राज्याच्या हातात आहे, केंद्र सकाराने सुद्धा सांगितलं आहे की राज्य आरक्षण देऊ शकतो. मनोज जरांगे यांना आरक्षण पटेल की नाही माहित नाही पण मराठा समजाला आरक्षण पटेल मान्य होईल. आरक्षण मिळावं यासाठी डेटा आम्ही गोळा करत आहोत, सर्वोच्च न्यायालयने आधी जो निर्णय दिला त्यानंतर आम्ही यावर काम करतोय, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. पंतप्रधान मोदीच नाही खर्गे सुद्धा म्हणताय २०२४ ची निवडणूक ही पॉलिटिकल केमिस्ट्रीची निवडणूक आहे.यामध्ये १+१ हे ११ होतात.ही केमिस्ट्री तयार झालीये.हे मोदीजींना माहिती आहे. लोकांना वाटतंय की आपला विचार करणारा पंतप्रधान आहे. त्यामुळे हा रिझल्ट येणार आहे. राज्यातून ४८ पैकी ४२ वर होतो त्यापेक्षा कमी जागा येऊ देणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# शिक्षक आणि पालक यांच्या संवादामुळे विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल : पालक प्रतिनिधी सोमनाथ नागणे

पंढरपूर/प्रतिनिधी: 'स्वेरीमधील आदरयुक्त शिस्तीमुळे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडत असतात आणि विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय जडते. त्यामुळे आमच्या पाल्यानी स्वेरीतच शिक्षण घ्यावे असे आम्हा पालकांना असे वाटते. स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच चांगले संस्कार घडवले जातात. त्यामुळे विद्यार्थी हा बाहेरील जगात स्पर्धा करण्यासाठी सज्ज होतो. एकूणच स्वेरीच्या माध्यमातून पालकांपर्यंत अखंड धागा जोडला गेलेला आहे. स्वेरीचे शिक्षक आणि पालक यांच्यातील संवादाचा विद्यार्थ्यांच्या करिअर वर परिणाम जाणवतो आणि विद्यार्थी उज्वल यश संपादन करतात.' असे प्रतिपादन पालक प्रतिनिधी सोमनाथ नागणे यांनी केले.

येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित पॉलिटेक्निक इंजिनिअरिंगच्या कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग व इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी या विभागांच्या पालक मेळाव्यात सोमनाथ नागणे हे बोलत होते. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून किशोर हुके, पुण्यातील उद्योजक प्रशांत जवळकर तर महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. कल्पना हुके व सौ. वर्षा धर्माधिकारी हे देखील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी पालकांचे स्वागत करून महाविद्यालयाची संपूर्ण माहिती दिली. कॉम्प्यूटर इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. पी.एस. भंडारे व इन्फोर्मेशन टेक्नोलॉजीचे विभागप्रमुख प्रा. जी.एस. मिसाळ यांनी आपल्या विभागांची सर्व माहिती दिली. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे असणारी 'कमवा आणि शिका' योजना, प्ले ग्राउंड, जिमखाना, एन.के.एन. प्रणाली, वाचनालयात उपलब्ध असलेली अभ्यासक्रमाची व स्पर्धा परीक्षेची पुस्तके, वसतिगृहातील सुविधा, वाहतुकीसाठी बस, १०२४ एम.बी.पी.एस. क्षमतेची वाय-फाय इंटरनेट सुविधा, फीडबॅक सिस्टम तसेच उच्चशिक्षित शिक्षकवर्ग, रात्र अभ्यासिका आदी बाबत सविस्तर माहिती दिली.

गतवर्षीच्या परीक्षेत ९० टक्केहून अधिक गुण मिळविलेले ५५ गुणवंत विद्यार्थी तसेच झोनल स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा या वेळी पाहुण्यांकडून सत्कार करण्यात आला. याच बरोबर अभिमन्यू कदम, प्रशांत जवळकर या पालकांनी काही सूचना आणि प्रश्न उपस्थित केले. प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी त्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. पालक विठ्ठल साळुंखे म्हणाले की, ' शिक्षण तर सर्वच जण देतात परंतु 'संस्कार' आणि 'शिस्त' फक्त याच स्वेरी महाविद्यालयातून मिळतात. त्यामुळे याठिकाणी प्रवेश मिळण्यासाठी स्पर्धा लागते आणि उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांवर येथे होत असलेले संस्कार फलदायी आहेत.' सौ. वर्षा धर्माधिकारी म्हणाल्या, 'आपल्या शिक्षण पद्धतीतून सर्वांचा विकास होत असताना परिश्रम करण्याची सवय विद्यार्थ्यांना जडते. ही बाब खूप महत्वाची आहे. तसेच येथील शिकविण्याची पद्धत, विद्यार्थ्यांच्या अपेक्षांची पूर्तता, सर्व सोयी-सुविधा, ट्रिपल पी.ई., प्राध्यापकांचा अभ्यासासाठी पाठपुरावा व गुणवत्ता वाढीसाठी सततचे प्रयत्न, हे देखील खूप महत्वाचे आहे.'

यावेळी जवळपास २०० पालक, प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्नेहा माने, कीर्ती पाटील सृष्टी नारायण व स्नेहल जगताप यांनी सूत्रसंचालन केले तर रुही तेंडुलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वागदरी येथील युवकाने इंदोर येथे आयोजित टॅटू मोहत्सवात रोवला मानाचा तुरा

वागदरी /एस.के.गायकवाड : धाराशिव(उस्मानाबाद) जिल्ह्यातील वागदरी ता.तुळजापूर येथील युवक संदीप अनिल वाघमारे यांनी नुकतेच इंदोर येथे आयोजित आंतरराष्ट्रीय टॅटू महोत्सवात प्रथम क्रमांक पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

वागदरी ता.तुळजापूर येथे अतीसामान्य कुटुंबात आई जयश्री व वडील अनिल रघुनाथ वाघमारे या मातापित्याच्या पोटी संदीप यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती हालाखीची. वडील सुतारकीचे काम करतात. कुटुंबात कोणी नौकरीस नाही.शेतजमीन नाही. बलुतेदार पध्दतीने शेतकऱ्यांना शेतीची लाकडी अवजारे बनविले, बैलगाडी,दारे,खिडक्या आदी बनविणे या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुंटुबाचा उदरनिर्वाह काटकसरीने चाललेला.हे लहानपणापासून संदीपने अनुभवले आहे.जि.प.प्राथमिक शाळा वागदरी येते प्राथमिक शिक्षण घेऊन जवाहर विद्यालय अणदूर येथे माध्यमिक शिक्षण घेतले. बदलत्या काळानुसार शेतीची नवनवीन लोखंडी आवजारे आले बैल जोडीवर पेरणी करणारी तिफण जवळपास बंद होऊन आता ट्रॅक्टरने नागरणी,कुळवणी, पेरणी होऊ लागली.त्यामुळे सुतारकी व्यवसाय ही आडचणीत येत असल्याचे संदीपच्या जणू लक्षात आले की काय त्यांनी पुढील शिक्षणाकडे पाठ फिरवून आई कडील आजाआजी व नातेवाईक यांच्या आधारावर थेट



पुणे गाठले. कामाच्या शोधत असतानाच त्याला छोट्या मशीन ने लहान मुलांच्या, युवकांच्या हातापायावर टॅटू (गोंधविणे) काढण्याचा छंद जडला. या छंदाचे व्यवसायात रुपांतर झाले. त्यांनी हाडपसर(पुणे)परिसरात भाड्याने गाळा घेऊन टॅटू चा व्यवसाय सुरु केला.आत्मविश्वास आणि कामावर निष्ठा असलीकी सर्व काही प्राप्त होते असे म्हणतात अगदी तसेच संदीपच्या बाबतीत घडले.संदीप आपल्या स्वत:वर आणि कामावर निष्ठा ठेवून काम करीत आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या डिझाइन, देवदेवतांच्या प्रतिमा, महामानवांच्या प्रतिमांचे सुंदर सुंदर टॅटू तो काढतो आहे.आज पुणे येथे तरुण तरुणी,परदेशी पर्यटक वगेरेंची मोठ्या प्रमाणात टॅटू काढण्यासाठी त्याच्या मोठी गर्दी असते. त्यातून बऱ्यापैकी उत्पन्न ही त्याला मिळते आहे. चारपाच बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्याचे ही कार्य त्यांच्या हातून घडले आहे.अल्प शिक्षित असूनही त्यांनी अवघ्या चोवीस पंचवीस वर्षांत फार मोठे वैभव निर्माण केले आहे. नुकतेच इंदोर येथे आयोजित इंक मी या आंतरराष्ट्रीय टॅटू मोहत्सवात त्यांनी भाग घेतला. या मोहत्सवात त्यांनी काढलेले तथागत भगवान गौतम बुद्ध आणि श्री गणेशाची मूर्तीच्या टॅटूने सर्वांचे लक्ष वेधले.याआंतरराष्ट्रीय मोहत्सवात त्यांनी प्रथम क्रमांक पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांनी कमविलेल्या या यशा बद्दल पुणे ,वागदरी व परिसरातील



मित्रपरिवारांनी त्यांचे आभिनंदन केले असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. भ्रमण ध्वनी वरूण त्यांच्यासी संपर्क साधला असता त्यांनी परदेशात जाऊन आपली टॅटू ची कला विकसित करण्याचा दाखविण्यातचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्यांच्या स्टॅंडिंग जागा असतील त्या जागा तशाच त्या पक्षांकडे महायुतीमध्ये राहतील. त्यापेक्षा कमी जागा कशा देणार.फक्त एक दोन जागी उमेदवार इकडे तिकडे जातील, असेही फडणवीस म्हणाले. गुजरात एक सक्षम राज्य आहे, मोठा भाऊ हा मोठा भाऊ राहणार महाराष्ट्र हा मोठा भाऊ आहे. लहान भावाचा विकास होत असेल तर वाईट वाटायचं कारण नाही मोठा भाऊ हा मोठाचं राहील आणि लहान भावाच्या पुढे जाईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### राज्यसभेसाठी महाराष्ट्रातील..

चंद्रकांत हंडोरे यांनी अर्ज दाखल केला त्यावेळी प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, काँग्रेस आणि महाविकास आघाडीने माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला राज्यसभेमध्ये पाठविण्याची तयारी दर्शवली, यामुळे मी आभारी आहे. माझे जिंकणे निश्चित आहे, राज्यसभेत महाराष्ट्राच्या जनतेची व्यथा मांडून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न मी करेन, सर्वधर्म समभाव निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न असेल. लोकशाहीमध्ये हार-जीत होत असते, विधान परिषदेमध्ये मी हरलो, तरी पक्षाची निष्ठा सोडली नाही.

### मराठवाड्याला पाणी देणाऱ्या

यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देत म्हणाले की, याशिवाय, नाबार्डच्या मदतीने अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पहिल्या टप्प्यात ३७ सिंचन प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. यासाठी ४ हजार ६४३ कोटी रुपये खर्च येणार असून, सिंचनक्षमता वृद्धीसाठी १५५ प्रकल्पांच्या कालवा दुरुस्ती आणि आधुनिकीकरणाची कामे करण्यात येणार आहेत. यासाठी ५ हजार ३५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहेत. पहिल्या टप्प्यात ही सुमारे १० हजार कोटींची कामे केल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी ३८ अपूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेली जाणार आहेत. अशी एकूण १५ हजार कोटी रुपयांची कामे केली जाणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

बळीराजा जलसंजीवनी योजना तसेच प्रधानमंत्री कृषीसिंचन योजनेत समाविष्ट नसलेल्या या प्रकल्पांसाठी २०१९ मध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला होता. आता नव्याने सुरु असलेल्या प्रयत्नांमुळे सिंचन प्रकल्पांना गतीने पूर्ण करता येईल. शिवाय, नियमित अर्थसंकल्पावर त्याचा भार पडणार नाही.

### जिल्ह्यात विभागीय चाचा नेहरु

विद्यार्थ्यांनी आनंदही साजरा करावा असे सांगितले. स्नेहालय बालगृह चंदा बेन शिंगवी यांनी मनोगत व्यक्त करताना शासनाचे आणि महिला व बालविकास विभागाचे आभार मानले.यावेळी चाईल्ड लाईनचे अनोज कदम यांनी खेळाडूंना शपथ दिली.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते चाचा नेहरूंच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी बाल बाल महोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त क्रिडा व कला गुण प्रदर्शित करीत भविष्यात विविध क्षेत्रात नावलौकिक करावा अशा शुभेच्छा मान्यवरांनी योवळी दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुख्याध्यापक शिरीष मते यांनी केले तर आभार प्रदर्शन जि.परिविक्षा वैशाली भोसले यांनी केले.

### माघ यात्रा २०२४ साठी आलेल्या..

येत आहेत या कामी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत असून स्वच्छतेसाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे

**अन्नदान** श्री संत तुकाराम मोहन येथील अन्नछत्रांमध्ये दु.१२.००ते२.००व७.००ते९.०० यावेळी चांदणं सुरू राहणार असून दर्शन रांगेत दशमी एकादशी द्वादशीला चहा साबुदाणा तांदळाची खिचडी तसेच पत्रा शेडमध्ये यंदा प्रथमच अन्नक्षेत्र सुरू करण्यात येत आहे

**लाईव्ह दर्शन व्यवस्था** मोबाईल प श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान पंढरपूर वरून श्री चे लाईव्ह दर्शन उपलब्ध असून पत्रा शेळी येथे एलईडी स्क्रीन बसवण्यात येत आहे. याशिवाय देणगी देण्यासाठी यंदा स्टॉलची निर्मिती ऑनलाईन देणगीसाठी ठठउजअ.ठळ्ळ. सोने चांदी उत्सव दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच महिला भाविकांच्या सोयीसाठी सॅनेटरी नॅपकिन हिरकणी कक्ष चेंजिंग रूम तसेच श्री चा प्रसाद म्हणून बुंदी लाडू प्रसाद यासाठी जादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे

तसेच वेदांत वेडे व्हिडिओकॉन विठ्ठल रुक्मिणी वा तीन भक्त निवास मधील ३६१ रूम मध्ये सुमारे सोळाशे भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे सदर यात्रा निर्विघ्नपणे सोळीत पार पाडण्यासाठी भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना अधिकाधिक सुखसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य सर्वश्री आ. रामचंद्र कदम श्रीमती शकुंतलाताई नडगिरी डॉ दिनेश कुमार कदम श्री भास्करगिरी बाबा श्री संभाजी शिंदे ह भ प ज्ञानेश्वर जळगावकर देशमुख अँड माधवीताई निगडे ह भ प प्रकाश जळगावकर श्री अतुल शास्त्री भगरे गुरुजी ह भ प शिवाजीराव मोरे व व्यवस्थापक श्री बालाजी बुधलवाड परिश्रम घेत असून बाराशे कर्मचारी स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री राजेंद्र शेळके यांनी दिली




भीम आभाळा एवढा,
तू त्या आभाळाचं आभाळ गं रमाई ।।
भीम उजेडाचं दान आम्हांला
तू त्या उजेडाचं उजेड गं रमाई ।।
भीम आम्हां शोषितांच्या मायेचा पदर,
तू त्या पदराची सोनेरी किनार गं रमाई ।।
भीम सागर अथांग ज्ञानाचा,
तू त्या सागराचं पाणी गं रमाई ।।
भीम वणवा जुल्मी व्यवस्था जाळणारा,
तू त्या वणव्याची ठिणगी गं रमाई ।।
भीम क्रांतीचा जळता निखारा,
तू त्या निखाऱ्याची धग गं रमाई ।।
भीम वाट तथागता कडे जाणारी,
तू त्या वाटेवरची सावली गं रमाई ।।
भीम जरी जगी ओळख भारताची,
तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई ।।

**कवी- संदेश शालिनी संभाजी कर्डक**

# पंढरपूर येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज ७३८ वा समाधी सोहळा निमित्त विविध कार्यक्रम

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील : येथे विश्वकर्मा निवास तानाजी चौक येथे संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या मूळ वास्तव्य जन्म स्थानी विद्यमान वंशाच्या मार्फत प्रतिवर्षीप्रमाणे श्री संत नरहरी महाराज यांचा ७३८वा समाधी सोहळा उत्सव दि २२/०२/२०२४तेदि.२८/०२/२०२४ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमात साजरा होणार आहे

यात्प्रसंगी विद्यमान वंशज ह भ प प्रमोद महाराज महामुनी यांनी सांगितले की २२ रोजी नरहरी महाराज महापूजा कलश पूजन ग्रंथ पूजन इत्यादी कार्यक्रम मान्यवरांच्या शुभहस्ते होईल तसेच दररोज सकाळी महापूजा अभिषेक श्री विष्णू सह मन पाठ स.९ते१०. नाममात्र जप दु.११/ते१२ते२.३० नरहरी महाराज गाथांवरील भजन हरिपाठ रात्री ७ते९ कीर्तनांदी कार्यक्रम होतील यावेळी ह भ प दर्शन महाराज बडवे गुरुवर्य धोंडोपंत दादा फडावरील ह भ प हरिभाऊ महाराज इंगळे ह भ प ऋषिकेश महाराज शिरसागर ह भ प माणिक महाराज मेहकर ह भ प प्रमोद महाराज महामुनी आदींचे हरी किर्तन होतील तर पुण्यतिथी दिनी दि २७ रोजी सुनील गजानन दीक्षित बंडी शेगाव यांच्या हस्ते पूजन करण्यात येईल दु१२.०५ वा समाधीवर व पादुकावर पुष्पवर्षाव होईल रात्री सात ते नऊ विद्यमान वंशज ह भ प प्रमोद महाराज महामुनी यांचे नरहरी महाराज जीवन चरित्रावर शिवशाही कीर्तन होईल २८ रोजी सकाळी नऊ वाजता दहा वाजता बारा काल्याचे किर्तन दादा महाराज रामदास यांचे होईल व यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात येईल तरी समाज बांधव व नरहरी भक्त प्रेमी भावी भक्तांने सदर कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे असे आव्हान संयोजक नरहरी महाराजांचे चि. प्रमोद प्रमोद महामुनी यांनी केले आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## खादी व ग्रामोद्योग मंडळा मार्फत शिबिराचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती व लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी एक दिवसीय जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिर शुक्रवार,दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजी माळशिरस तालुक्यातील फोंडशिरस येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरीकांनी या शिबिरात सहभागी होऊन लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी केले आहे.

या शिबीरात मध केंद्र योजना मधमाशापालन, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्र्वकर्मा कौशल्य सन्मान योजना आदी योजनांची माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, फलोत्पादका, सेंद्रीय शेती उत्पादक शेतकरी तसेच सुशिक्षीत बेरोजगार व महिला बचत गट, तरुण तरुणी, सर्व घटकातील युवक युवतींनी मेळाव्यास उपस्थित राहुन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री. बनसोडे,यांनी केले आहे.

## श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने जल्लोषात छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिष्ठापना

सोलापूर/प्रतिनिधी: शिवजयंतीच्या पार्श्र्वभूमीवर डाळींब आड मैदान शिंदे चौक येथे श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने अखंड हिंदूस्थानचे आराध्यदैवत ,स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्र्वारुढ भव्य मुर्तीची आमदार विजयकुमार देशमुख , आमदार सुभाष देशमुख ,अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या शुभहस्ते प्राण प्रतिष्ठापना करण्यात आली.तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते ध्वराजोहन संपन्न झाले .यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय ,छत्रपती संभाजी महाराज की जय , राजमाता जिजाऊ माँसाहेब की जय भवानी जय शिवाजी च्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला.या प्रसंगी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने डाळींब आड शिंदे चौक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली.याप्रसंगी पोलिस उपायुक्त विजय कबाडे ,अतिरीक्त आयुक्त संदीप कारंजे ,मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पदमाकर ऊर्फ नानासाहेब काळे ,ट्रस्टी उपाध्यक्ष श्रीकांत डांगे ,ट्रस्टी कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे ,राजन जाधव ,पुरुषोत्तम बरडे ,माऊली पवार ,विनोद भोसले ,

भाऊसाहेब रोडगे ,जयवंत सलगर ,मा.अध्यक्ष मतिन बागवान ,उसव अध्यक्ष सुभाष पवार ,कार्याध्यक्ष रवी मोहीते,उपाध्यक्ष अर्जुन शिवसिंगवाले,अंबादास सपकाळ , नागेश इळमेली , खजिनदार सुशील बंदपट्टे ,सचिन तिकटे ,गणेश माळी ,मिरवणूक प्रमुख महेश धाराशिवकर ,उपमिरवणूक प्रमुख नामदेव पवार ,कुस्ती प्रमुख बाप्पू जाधव ,अमर दुधाळ ,कार्यालयीन प्रमुख सचिन स्वामी ,देविदास घुले ,प्रसिद्धी प्रमुख,बसवराज कोळी ,विजय पुकाळे ,प्रकाश ननवरे ,अंबादास शेळके ,सुनील शेळके ,सोमनाथ शिंदे ,जितु



वाडेकर ,बजरंग जाधव ,सदाशिव पवार ,सचिन शिंदे ,दिनकर जगदाळे ,लहु गायकवाड ,देविदास घुले ,सचिन स्वामी ,मनिषा नलावडे ,चारुशिला दिनकर जगदाळे ,अश्र्विनी अभिमन्यु भोसले ,राधा मोहन पवार ,लक्ष्मी बबन माने ,सुवर्णा बाजीराव यादव, रणदिवे,लता ढेरे, उपस्थित होते...

## आपली फसवणूक होवू नये यासाठी.. शेतकऱ्यांनो सावध राहा : पो.नि.नंदकुमार कदम

निफाड/प्रतिनिधी: सध्या द्राक्ष हंगाम सुरू असून बरेचसे बाहेरील राज्यातील द्राक्ष व्यापारी हे स्थानिक पायलट/ गावातील मध्यस्थी इसमाच्या मदतीने शेतकऱ्यांकडून द्राक्ष माल विकत घेतात .परंतु शेतकऱ्यांना बाग खुडल्यानंतर पैसे कींवा चेक देतात .काहीजण द्राक्षाचा माल घेऊन रातोरात पळून जातात. यामध्ये शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होते. त्या द्राक्ष व्यापाऱ्यांचा ठाव ठिकाणा माहीत नसल्याने शेतकरी संकटात सापडतात. शेतकरी बांधवांनो सावध रहा. आम्ही तुमच्या सोबत असून आपली फसवणूक होऊ नये यासाठी खालील सूचनांचे पालन करा असे आवाहन निफाड पोलीस ठाणे येथे नव्यानेच रुजू झालेले पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांनी केले आहे.निफाड पोलीस ठाणे तर्फे शेतकऱ्यांना सावध करण्यात येते की शेतकऱ्याने व्यापारी हा गावात आल्यानंतर त्यास प्रथम पोलीस पाटील यांनी पोलीस ठाणे मध्ये घेऊन या,प्रत्येक व्यापाऱ्याचे आधार



कार्ड/ मतदान कार्ड बँकेची सर्व माहिती बघा व ते कागदपत्र तपासणी करिता निफाड पोलीस ठाणे व्यापारी व पायलट यांना घेऊन या, व स्थानिक व्यक्ती शेतकऱ्यांची प्रत्यक्षपणे संपर्क करतो त्यामुळे शेतकरी बांधवांनी त्यांचेवर विश्र्वास ठेवू नये, पूर्व इतिहास पडताळून पहावा ज्या भागात व्यापारी आपला माल द्राक्ष पाठवितो तेथील व्यापाऱ्यांची माहिती व्यापाऱ्यांकडून रिसीट घेणे लोडिंग नंबर सुपरवायझर कडून घेणे व्यवहाराची पावती घेणे, आगाऊ चेक घेऊन ठेवा तरी शेतकरी बांधवांनी वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे पोलीस हे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील आपली फसवणूक होऊ नये

यासाठी प्रत्येकाने काळजी घेण्याचे आवाहन निफाड पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांनी केले आहे

## धाराशिव,तुळजापूर व उमरगा- लोहारा विधानसभेच्या संयोजक पदी पवार यांची निवड

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकनिष्ठपणे काम करणारे बंजारा समाजातील धडाडीचे कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीचे सुपर वॉरियर्स बंजारा समाजाच्या तांडा वस्तीच्या सर्वांगीण विकासासाठी कायम झटणारे तुळजापूर तालुक्यातील मौजे खुदावाडी पाटील तांडा येथील प्रवीण राम पवार यांची महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने तांडा वस्ती जनसंपर्क अभियानाचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक डॉ.मोहन चव्हाण यांनी तुळजापूर धाराशिव विधानसभा तथा उमरगा लोहारा विधानसभाच्या संयोजक पदी नियुक्ती केली आहे.

दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून तुळजापूर विधानसभेचे आमदार राणाजगजीत सिंह पाटील यांच्या हस्ते प्रवीण राम पवार यांना सदर नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले.,तसेच पुढील वाटचालीस त्यांचे अभिनंदन



करून शुभेच्छा देण्यात आले.

याप्रसंगी भाजपा धाराशिवचे सरचिटणीस महामंत्री दीपक आलूरे,प्रदेश कार्यकारणी सदस्य,विजय शिंगाडे,नळदुर्ग चे नगरसेवक निरंजन राठोड,उदय जगदाळे, सुशांत भूमकर,भाजपाचे किशोर धुमाळ,वसंत पवार, वसंत जाधव,अनिल पवार,हरी पवार आधी सह कार्यकर्ते उपस्थित होते.सदर त्यांच्या सार्थ निवडीचे सर्वत्र आभिनंदन होत आहे.

## रोपळे येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधी: राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या किमान समान शिबीर कार्यक्रमा अंतर्गत तालुका विधी सेवा समिती पंढरपूर व पंढरपूर अधिवक्ता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजीभाऊ बाबा पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रोपळे बुद्रुक (ता.पंढरपूर) येथे जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे, यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाणी न्यायाधीश पी. पी. बागुल, यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थींना कायदेविषयक लैंगिक अत्याचारांपासून १८ वर्षांखालील मुला-मुलांचे संरक्षण करण्याच्या हेतूने २०१२ मध्ये प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्युअल ऑफेन्स म्हणजे पोक्सो या कायद्याबाबत जनजागृती केली. सदर शिबीरादरम्यान पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड अर्जुन पाटील यांनी शिबीराची प्रस्तावना केली. अधिवक्ता संघाचे सचिव यांनी इतर कायद्यांची माहिती दिली व कार्यक्रमाचे आभार उपाध्यक्ष ड शशिकांत घाडगे यांनी केले. या शिबीरास पंढरपूर अधिवक्ता संघातील पदाधिकारी, श्री. शिवाजीभाऊ बाबा पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयचे मुख्याध्यापक ए. के. गायकवाड, न्यायालयीन कर्मचारी वाय. बी. बोबे, व्ही. डी. ढोबळे, एस. एस. भोरे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोरेगाव भिमा विजय रणस्तंभ सेवा संघाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदी अविनाश आठवले यांच्या निवड



अक्कलकोट/प्रतिनिधी: कोरेगांव भिमा विजय रणस्तंभ सेवा संघाचे सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी अविनाश आठवले यांची निवड करण्यात आली आहे.

कोरेगाव भिमा विजय रणस्तंभ सेवा संघाचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष सर्जेराव (भाऊ) वाघमारे यांनी ही निवड पत्र दिले असून अविनाश दीपक आठवले यांचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदी निवडीचे पत्र सोलापूरचे शहर अध्यक्ष भागप्पा प्रसन्न यांच्या हस्ते देऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आली आहे.

निवडी दरम्यान सोलापूर महानगर पालिकेचे माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समितीचे सभापती मधुकरजी आठवले, सोलापूर शहर अध्यक्ष भागप्पा प्रसन्न, जिल्हा संपर्क प्रमुख संदीप वाघमारे,रिपाइं(आठवले गट)चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,व्हि आर प्रतिष्ठान आणी आनंद तरुण मंडळाचे

राजाभाऊ आठवले,श्रीकांत कांबळे,विशाल शिंगे, दादा रणखांबे, तुषार सीताफळे, अभिषेक कांबळे, प्रशांत गायकवाड, केवल फडतरे, प्रदीप गायगवळी,भैय्या भडंगे,समर्थ गायकवाड, निशांत आठवले व मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.अविनाश आठवले यांच्या जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरली आहे.

## निखिल वागळे यांच्या हत्येच्या निषेधार्थ पुरंदर पत्रकार संघाचा सासवड येथे मोर्चा

पुरंदर/प्रतिनिधी: पुरंदर : जेष्ठ पत्रकार निखिल वागळे, ॲड असिम सरोदे व सामाजिक विचारवंत विश्र्वंभर चौधरी यांच्यावर पुण्यात झालेल्या हल्लयाचा पुरंदर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मोर्चा काढून निषेध व्यक्त करण्यात आला. त्याच बरोबर संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली या बाबतचं निवेदन सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांना देण्यात आले.सासवड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून शिवतीर्थ ते पोलीस स्टेशन असा मोर्चा पत्रकारांच्या वतीने काढण्यात आला. यावेळी हल्लेखोरांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर सरकार पुरस्कृत काही व्यक्ती घाला घालत आहेत. असा आरोप यावेळी करण्यात आला, यावेळी पुरंदर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कामथे, प्रवीण नवले, अमोल बनकर, भुजबळ, एम.जी शेलार, दत्ता भोंगळे, बी एम काळे, सुनील लोणकर, राहुल शिंदे, निखिल जगताप, संतोष डुबल, किशोर कुदळे, संतोष जंगम, एन.आर




जगताप, निलेश जगताप, आजिम आत्तार, हनुमंत वाबळे, सुनील धिवार, सुजाता गुरव, छाया नानगुडे, शिवदास शितोळे, अमृत भांडवलकर, ए.टी माने, राजेश काकडे, बाळासाहेब पवार, नवनाथ राणे, बाळासाहेब धुमाळ, रामदास लांघी, राणे, उपस्थित होते. यावेळी बोलताना पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष बी. एम. काळे म्हणाले, पत्रकारांवरील हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत, सरकारने पत्रकार संरक्षण कायद्याची कडक अंमलबजावणी करावी अशी मागणी केली,

## नागणसुर कन्नड मुली शाळेत संत सेवालाल जयंती उत्साहात

अक्कलकोट/प्रतिनिधी: तालुक्यातील नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली व मुले शाळेत श्री संत सेवालाल जयंती निमित्त आज श्री संत सेवालाल प्रतिमा पुजन करून मोठ्या उत्साहात आचरण करण्यात आले

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव होते.प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्य सिद्धेश्र्वर गंगोंडा ,नागणसुर मराठी शाळेचे नूतन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विश्र्वनाथ प्रचंडे,उपाध्यक्ष बसवराज मोरे,कन्नड मुले शाळेचे नूतन अध्यक्ष बसनिंगप्पा स्थावरमठ,उपाध्यक्ष गजानंद रेवी,कन्नड मुली शाळेचे अध्यक्ष गंगाधर भोसगी,उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी , शिवानंद धरगोंडा उपस्थित होते.प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमा पूजन करून पुष्पवृष्टी करून अभिवादन देण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड व मराठी शाळेचे नूतन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष यांच्या सत्कार कन्नड मुली शाळेचे अध्यक्ष



आणि उपाध्यक्ष यांच्या हस्ते करूंन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले तर आभार शिवशरण म्हेत्रे सर यांनी मानले.शाळेचे मुख्याध्यापक मल्लप्पा कवठे,कल्लय्या गणाचारी,शांताबाई तोळणूरे,राजशेखर खानापुरे, शरणप्पा फुलारी,बसय्या स्वामी, विजयालक्ष्मी एंटमन, चननम्मा बिराजदार,शिवशरण म्हेत्रे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## परमेश्वर कलेक्शन या नवीन फर्मचे वागदरी येथे सुरुवात

अक्कलकोट/प्रतिनिधी: वागदरी ता. अक्कलकोट येथे परमेश्र्वर कलेक्शन या नवीन फर्मचे उद्धाटन ऋतुराज कोरवी प्रो कबड्डी फेम, संजय महाजन प्रो कबड्डी फेम, योगेश परदेशी नवी मुंबई पोलीस, यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी गोगांवचे उपसरपंच

कमलाकर सोनकांबळे, किरनळी सरपंच सतीश कणमुसे, नंदकिशोर बगाडे नवी मुंबई पोलीस, परमेश्र्वर जाधव टायगर ग्रुप शहर अध्यक्ष लातुर,गुरुशात वमने, भिमा ऊमराणे, शलीम



शेख,नरसु मोहळकर,अदित सरसोबी, संतोष कणमुसे, धानलिंग सलगरे, बसवराज चौगुले, सौरभ उंबरे, परमेश्र्वर हतीकाळे. उपस्थित होते कपड्यांचे नवीन नवीन व्हरायटी ,लहान मुले, युवकांचे नवीन फॅशन कपडे महिलांसाठी विविध व्हरायटी सोबत अनेक नवीन मॉडेल कपडे कमीत कमी किंमतीत उपलब्ध असल्याचे माहिती शिवा माने व राज यादव यांनी सांगितले

# मनोज पाटील जरांगे यांच्या उपोषणार्थ; निफाडमध्ये कडकडीत बंद

निफाड : सकल मराठा समाजाच्या आरक्षणा च्या प्रश्नावर विशेष अधिवेशन बोलवावे, या मागणीसाठी मराठा संघर्ष योध्दा मनोज पाटील जरांगे यांनी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणास पाठींबा म्हणून सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवार १५ फेब्रुवारी रोजी पुकारलेल्या निफाड बंदच्या आवाहनास जोरदार प्रतिसाद मिळाला.असुन शहरासह तालुक्यातील काही ठिकाणी तर निफाड शहरात या बंदच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाने पुकारलेल्या बंदला स्वयंस्फूर्तीने व्यापार्यांनी आपापली दुकाने बंद ठेवून या आंदोलनास सहकार्य केले .. गुरुवारी सकाळपासूनच मध्यवर्ती भागातील तसेंच गल्लीतील व्यापारी पेठेतील एकही दुकान निर्धारित वेळेत उघडले नाही. अन्यत्रही तेच चित्र होते.



बाजारपेठांमधून कडकडीत बंद पाळण्यात आला. सर्वदूर कमालीचा शुकशुकाट दिसून आला.सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी मोबाईल व्हाटस्पद्वारे. जनजागृती करून शहरातील विविध भागात व्यापार्यांना बंदचे आवाहन केले होते. ... शांती नगर चौफली.माकड बाबा चौक.छ.शिवाजी महाराज चौक.उगाव रोड.कुंदेवाडी रोड. अन्य भागातही कडकडीत बंद पाळण्यात आला ग्रामीण भागातही छोट्या मोठ्या खेड्यांमधील दुकाने बंद होती.... निफाड पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नंदकुमार कदम यांचे मार्गदर्शना खाली शहरात कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीस्थिती वर लक्ष ठेवून होते.बंद शांततेत पाळण्यात आला

ई-केवायसीसाठी गावपातळीवर विशेष मोहीम

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ; २१ फेब्रुवारीपर्यंत मुदत

सोलापूर/प्रतिनिधीः प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ई- केवायसी करण्यासाठी २१ फेब्रुवारीपर्यंत गावपातळीवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन ई- केवायसी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या मोहिमेची क्षेत्रीयस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

या मोहिमेदरम्यान केवळ ई-केवायसी प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या नजिकचे सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी यांच्यामार्फत ई-केवायसी प्रमाणिकरण पूर्ण करावे. शेतकऱ्यांनी स्वतःचे ई-केवायसी प्रणाणिकरण करण्यासाठी मोबाईलवरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र. पीएम किसान फेस ऑथेंटिकेशन ॲप या सुविधांपैकी कोणत्याही एका सुविधेचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

पीएम किसान योजनेचा हप्ता फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात

पीएम किसान योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रमाणिकरण, योजनेसाठी नव्याने नोंदणी करणे, बँक खाते आधार क्रमांकास जोडणे या बाबीची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः हजर असणे आवश्यक आहे. बँक खाती आधार संलग्न करणे बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी प्राधान्याने नजीकचे पोस्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे. केंद्र शासनाकडून पीएम किसान योजनेचा १६ वा हप्ता फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात वितरित करण्यात येणार आहे. तसेच पीएम किमान योजनेचा लाभ अदा केलेल्या लाभार्थीनाच राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ होईल. या दोन्ही योजनांच्या लाभासाठी २१ फेब्रुवारीपर्यंत आवश्यक बाबींची पूर्तता या मोहिमेदरम्यान करावी, असे आवाहन शेतकरी बांधवांना करण्यात आले आहे.शेतकऱ्यांना निश्र्चित उत्पन्न मिळवून देणाऱ्या केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची संपृक्तता साध्यतेसाठी ६ डिसेंबर २०२३ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत राबविलेल्या मोहिमेत १.०४ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणिकरण, ३.०१ लाख स्वयंनोंदणीकृत शेतक-यांची नव्याने नोंदणी करण्यात आली.

तथापि, राज्यातील एकुण १.९४ लाख शेतकऱ्यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक इतर सर्व बाबींची पूर्तता केलेली असून त्यांचे केवळ ई-केवायसी करणे बाकी आहे. अशा शेतकऱ्यांचे मुख्यतः सामाईक सुविधा केंद्र (सीएससी) मार्फत ई-केवायसी प्रमाणिकरण करण्यासाठी २१ फेब्रुवारीपर्यंत ही संपृक्तता मोहीम राबविण्यात येत आहे.

# १७ फेब्रुवारीला फलटण मधून महादेव जानकर माढ्याचे रणशिंग फुंकणार : सुनिल बंडगर



अक्कलकोट/प्रतिनिधीः राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री आ.महादेव जानकर माढा मतदारसंघातून दंड थोपटणार आहेत. यासाठी रासपकडून १७ फेब्रुवारीला माढा विजय निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, जानकरांच्या नेतृत्वात जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात येणार आहे.

१७ फेब्रुवारीला माण तालुक्यातील शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाला अभिषेक घालून दर्शन घेऊन जानकर यांच्या नेतृत्वात भव्य रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली शिंगणापूर - कोथळे - जावली - मिरडे - नाईकबोमवाडी - वडले - सोनवडी - सोनवडी बुद्रुक - कोळकीमार्गे फलटण शहरातून मेळाव्याच्या ठिकाणी मंगल कार्यालय येथे दुपारी एक वाजता दाखल होणार आहे. महादेव जानकर हे माढ्यातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने पक्षाकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. काहीही करून माढा मतदारसंघ जिंकायचाच यासाठी रासपकडून माढा मतदारसंघात घोंगडी बैठकांचा धडाका सुरू करण्यात आला आहे. या बैठकांना जनतेचा चांगला प्रतिसाद मिळत असून, विद्यमान खासदारांचे मतदारसंघातील जनतेला दर्शनदेखील दुर्लभ झाले आहे. मतदारसंघात पाण्यासह उद्योग, रोजगार, शेतकऱ्यांचे प्रश्र्न अशा असंख्य समस्या असल्याचे घोंगडी बैठकीत मतदारांकडून व्यक्त केल्या जात आहेत. त्यामुळे या खासदाराला आता घरी पाठवण्यासाठी आणि मतदारसंघांचे निस्वार्थी भावनेने प्रश्र्न सोडवण्यासाठी माढा विजय निर्धार मेळ्यावत बहुसंख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांनी केले आहे.

**जानकर काय बोलणार याकडे लक्ष ?**

रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांनी आगामी लोकसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्धार केला आहे. राज्यातील ४८ जागांवर रासपचे उमेदवार दिसून येतील, तर स्वत: महादेव जानकर हे माढा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. यासाठी १७ तारखेच्या माढा विजय निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, या मेळाव्यात जानकर हे निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहेत.

# संभाजी नगर येथील प्रगती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने प्रा.एस.आर.जडगे यांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार प्रदान




दर्शनाळ/देविदास माने : छत्रपती संभाजी नगर येथील प्रगती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार एस व्ही सी एस कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. एस आर जडगे यांना देण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे उपायुक्त जयश्री सोनकवडे हे होते. संभाजीनगरचे पोलिस उपनिरीक्षक आणि दामिनी पथक प्रमुख कांचन मिरघे व वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन मिरघे यांच्या हस्ते प्रा. जडगे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आला. यावेळी बोलताना प्रा जडगे यांनी गेल्या वीस वर्षांपासून सोलापूर येथे अध्यापनाचे कार्य करीत असून सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी जिल्ह्यातील अनेक शाळा आणि महाविद्यालयातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना व्याख्यानाच्या माध्यमातून इंग्रजी विषयावर मोफत मार्गदर्शन केले आहे आतापर्यंत विविध सामाजिक संस्थेच्या वतीने दहा पुरस्कार मिळाले आहेत. याप्रसंगी बोलताना प्रगती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रोहित गिरी यांनी गेल्या बारा वर्षांपासून संस्थेच्या वतीने समाजातील सर्वसामान्य घटकांच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी झटणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे आतापर्यंत ३८ जणांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक कांचन मिरघे व जयश्री सोनकवडे यांनी सेवाभावी संस्थेच्या कार्याचा गौरव केला. यावेळी संस्थेचे सचिव श्र्वेता गिरी यांच्यासह पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात अशासकीय लिपिक टंकलेखक पदाची भरती

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे लिपिक टंकलेखकाचे अशासकीय एक पद भरावयाचे असून जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह अर्ज दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रत्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,

सोलापूर येथे सादर करावा.सदर पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येतील तरी उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. सदर पदाकरीता उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन व संगणक हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सदर पदाकरीता मासिक एकत्रित मानधन रुपये २४ हजार ७९ देय राहील. सदर पद हे फक्त माजी सैनिक संवर्गातून भरण्यात येणार आहे. तसेच सदर पदाकरीता सैन्यातील लिपिक संवर्गातील माजी सैनिकास प्राधान्य देण्यात येईल. जिल्यातील माजी सैनिकांनी याचा लाभ घ्यावा असे, अवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.



# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ. सुरेखा कल्याणशेट्टी मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

गिरजामाता मराठी व सेमी इंग्रजी प्राथमिक विद्यालय, नालंदा विद्यार्थी वसतीगृह यांच्या वतीने संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेने जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी व संचालक मल्लिनाथ मसुती यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

यावेळी प्राध्यापक राजशेखर पवार यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. या कार्यक्रमास संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संस्थेच्या सीईओ रूपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे,प्राथमिक मुख्याध्यापक सुरेश आवटे, खंडेराव घाटगे,सेमीचे निखील भालेराव, सर्व प्राध्यापक, शिक्षक , कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला सरपंच व तिचा पती अँटी करप्शनच्या जाळ्यात ; दहा हजाराची घेतली लाच



सोलापूर/प्रतिनिधी : सभा मंडपाचे कामाचे बिल काढण्यासाठी ठेकेदाराकडून दहा हजाराची लाच घेणाऱ्या सांगोला तालुक्यातील आलेगावच्या महिला सरपंच व तिच्या पतीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगीहात पकडले.

पांडुरंग रामचंद्र दिवसे, वय ५१ वर्ष, खाजगी इसम (महिला सरपंच यांचे पती) राहणार आलेगाव तालुका सांगोला जिल्हा सोलापूर व नंदाबाई पांडुरंग दिवसेवय ४३ वर्षे पद- सरपंच मौजे आलेगाव ग्रामपंचायत ता. सांगोला असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केलेल्या पती-पत्नीचे नाव आहे.यातील तक्रारदार हे कंत्राटदार असून त्यांना मौजे आलेगाव मधील बाबरवाडी हनुमान मंदिरासमोरील सभा मंडपाचे काम मिळाले होते. सदरचे काम तक्रार यांनी पूर्ण केल्याने त्या कामाची बिल मिळणे बाबत ग्रामपंचायत येथे पाठपुरावा करत असताना मोजे आलेगावचे महिला सरपंच यांचे पती यांनी तक्रारदार यांच्याकडे ८००० रुपये लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारीदार यांनी त्यांच्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत अँटी करप्शन ब्युरो, सोलापूर येथे तक्रार दिली.प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि.१७.०१.२०२४, दि. २३.०१.२०२४ व दि. २९.०१.२०२४ रोजी पंचा समक्ष पडताळणी केली असता, यातील आरोपी पांडुरंग रामचंद्र दिवसे ( महिला सरपंच यांचे पती) यांनी तक्रारदार यांच्याकडे यापूर्वी केलेल्या कामाचे २००० रुपये व सध्याच्या कामाचे ८००० रुपये असे एकूण १०००० रुपये लाचेची मागणी केली. सदर बाबत महिला सरपंच यांच्याकडे पडताळणी केली असता, त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे पती पांडुरंग दिवसे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे दि. १५.०२.२०२४ रोजी यातील तक्रारदार यांनी महिला सरपंच यांचे पती यांची भेट घेऊन बिलाचा विषय काढला असता महिला सरपंचाचे पती यांना तक्रारदार यांच्याकडून १०,००० रुपये लाच रक्कम स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. यावरून सांगोला पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १८८६ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता

मुंबई : नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या विकास कामांसाठी १८८६.९१ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी महानगर प्रदेशातील २५ गावांकरीता अमृत टप्पा दोन मधून मलनिस्स:रणासाठी सुमारे ७१६ कोटी खर्चाच्या वाहिनीच्या कामाचा समावेश आहे. ही विकासकामे जलदगतीने पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, एनएमआरडीए आयुक्त मनोज सुर्यवंशी आदी उपस्थित होते.नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील दक्षिण ब आणि पूर्व अ या भागातील सुमारे २५ गावांमधील मलनिस्सारणाकरिता ५०० किमी लांबीची मलनिस्सारण वाहिनी अमृत टप्पा २ मध्ये मंजूर करण्यात आली आहे. या योजनेमध्ये चार मलनिस्सारण प्रकल्प आणि एक पंप हाऊस यांचा समावेश आहे.



आज झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेल्या १८८६.९१ कोटीच्या अंदाजपत्रकात कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा तीर्थक्षेत्र विकास टप्पा ३, दीक्षाभूमी विकास, कर्करोग रुग्णालय, हिंगणा क्षेत्रातील मुलभूत सुविधा, पूर मदत निधी, रस्ते विकास, प्रधानमंत्री आवास योजना, श्री क्षेत्र धापेवाडा येथे मलनिस्सारण केंद्राचे बांधकाम, पर्यटन विकास यासारख्या विकास कामांचा समावेश आहे.